# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३४३/२०२४ — दिनांक ०९/०९/२०२४

## प्रेस नोट

## “घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक करुन २,९५,०००/-रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करुन घरफोडीचे ०४ गुन्हे उघड करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश”

दिनांक २२.०८.२०२४ रोजी ११.३० ते १२.४५ वाजेचे सुमारास पाणजु गांव, क्रिकेट मैदान जवळ, साईबाबा मंदीर मार्ग, ता. वसई जि. पालघर येथे विनायक भोईर याचे राहते घरी कोणीतरी अज्ञात चोरटयाने खिडकीवाटे प्रवेश करुन राहते घरातील लॉकर तोडुन २०,०००/- रुपये रोख रक्कम तसेच २,९५,०००/-रुपये किमतीचे सोन्याचे दागिने घरफोडी करुन चोरुन नेल्याने अज्ञान इसमाचे विरुध्द वसई पो.स्टे. गुनोक्र. १९६/२०२४, बीएनएस ३०५(अ), ३३१(३) प्रमाणे दिनांक २२/०८/२०२४ रोजी १९.१८ वाजता दाखल करण्यात आला होता.

मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी आयुक्तालयाचे अभिलेखावरील घरफोडीचे गुन्हे तात्काळ उघडकीस आणणे बाबत सुचना दिल्या असल्याने प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख यांनी त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांना वरिष्ठांचे आदेशा प्रमाणे सुचना दिल्या होत्या.

मध्यवर्ती गुन्हे शाखेतील सपोनि दत्तात्रय सरक, सफौ. मनोहर तावरे, पोहवा. शिवाजी पाटील, सतिष जगताप, गोविंद केंद्रे यांनी गुन्हयाचा तांत्रिक तपास करुन गुप्त बातमीदार मार्फत आरोपीचे निष्पन्न केले त्याअनुषंगाने आरोपीबाबत माहिती प्राप्त करुन जिल्हा परिषद शाळा, गांव-वाढीव, पो.नवघर, ता.जि.पालघर येथे सापळा रचून त्यास २९.०८.२०२४ रोजी शिताफीने ताब्यात घेतले असता त्याने आपले नांव धिरज रमाकांत पाटील, वय-२२ वर्षे, रा.मु.वाढीव, घर नं.११८, पो. नवघर, ता.जि.पालघर असे सांगितले. नमुद आरोपीकडे प्राथमिक तपास करता त्याने बंद घराचा दरवाजाचे कुलूप स्क्रु ड्रायव्हरचे सहाय्याने तोडून घरात घूसून सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे लागलीच दोन पंचाना बोलावुन त्याचे राहते घराची घरझडती घेता खालील प्रमाणे घरफोडी चोरीतील सोन्याचे दागिने व स्क्रु ड्रायव्हर असे मिळून आल्याने गुन्हयाचे तपासकामी पंचनाम्यासह जप्त केले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ६०,०००/- | रुपये किंमतीच्या ११.९५० ग्रॅम वजनाचे सोन्याच्या एकुण ०७ अंगठया जु.वा.किं.सु. |
| २. | २,००,०००/- | रुपये किंमतीचे ३९.३६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी-मंगळसुत्र ०१ नग जु.वा.किं.सु. |
| ३. | २५,०००/- | रुपये किंमतीचे ०.८६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे माश्याच्या आकाराचे लॉकेट जु.वा.किं.सु. |
| ४. | १०,०००/- | रुपये किंमतीचे ०.५९० ग्रॅम वजनाचे सोन्याचे बदमाचे आकाराचे लॉकेट जु.वा.किं.सु. |
| ५. | ००.००/- | रुपये किंमतीचे स्टीलचे त्यास हिरवी मुठ असलेले ०३ स्क्रु डायव्हर जु.वा.किं.सु |
| | २,९५,०००/- | एकुण रक्कम |

ताब्यातील आरोपीकडे गुन्हयाचे अनुषंगाने अधिक तपास करता त्याने खालील नमुद आणखी गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

| | |
|---|---|
| १. | वसई पो.स्टे. गुनोक्र. १९६/२०२४, बीएनएस ३०५(अ), ३३१(३) प्रमाणे. |
| २. | केळवा सागरी पो.स्टे. जि.पालघर गुनोक्र. ८१/२०२३ भादंविसंक ४५४, ४५७, ३८० प्रमाणे. |
| ३. | केळवा सागरी पो.स्टे. जि.पालघर गुनोक्र. ४९/२०२४ भादंविसंक ४५४, ४५७, ३८० प्रमाणे. |
| ४. | केळवा सागरी पो.स्टे. जि.पालघर गुनोक्र. ५०/२०२४ भादंविसंक ४५४, ३८० प्रमाणे. |

नमुद पाहीजे आरोपीस वसई पो.स्टे. गुनोक्र. १९६/२४, बीएनएस ३०५(अ), ३३१ (३) मधील गुन्हयात पुढील कायदेशीर कार्यवाही करीता वसई पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अविनाश अंबुरे व सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरी. राहुल राख, पोनि. धनंजय पोरे, सपोनि. दत्तात्रय सरक, पोउपनिरी. हितेंन्द्र विचारे, सफौ. श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा. शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, सतिष जगताप, हनुमंत सुर्यवंशी, संग्राम गायकवाड, संतोष मदने, प्रविणराज पवार, महेश वेल्हे, अनिल नागरे, पोशि.नितीन राठोड, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी, सफौ.संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी केलेली आहे.

**----000----**